# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email : vdodehu@gmail.com**

जा.क्र आस्था/ ७१४ /२०२२-२३ दि. ०४/१०/२०२२

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा वार सोमवार दिनांक.१७/१०/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

**नमूद 'अ' चे जोडपत्र**

**देहू नगरपंचायतीची सोमवार दिनांक.१७/१०/२०२२ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.**

**सभेपुढील विषय .**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३) देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व पाथविक्रेते/ फेरीवाले मिळून पथाविक्रेता समिती स्थापन करणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

४) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत देहू नगरपंचायत हद्दीत विविध कामे घेणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू आळंदी रोड मुख्य कमान ते तळवडे हॉस्पिटल रस्ता रुंदीकरण करणे व डावी व उजवी बाजू बंदिस्त भूमिगतगटर बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) मुख्य कमान ते परंडवाल चौक ते राधाकृष्ण मंगल कार्यालय रस्ता रुंदीकरण करणे व डावी व उजवी बाजू बंदिस्त भूमिगतगटर बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जुन्या १.५ MLD क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे, क्षमता वाढवणे व त्या अनुषंगिक कामे करून घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील ३.५ MLD क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करून घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९) संत तुकाराम विद्यालय कन्या शाळेच्या मागे ड्रेनेज घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१०) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये तुंबलेले मलनि:सारण वाहिनी,चेंबर इ.ठिकाणी आवश्यक कामे करणेकरिता निविदा पद्धतीने जेट मशीन व सक्शन मशीन कंत्राटी पद्धतीने घेणे बाबत.

Scanned with OKEN Scanner

११) देहू नगरपंचायतीची विकास योजना तयार करणे करीता विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१२) देहू नगरपंचायत हद्दीतील जोते तपासणी, झोन दाखला,भोगवटा प्रमाणपत्र,राडारोडा शुल्क अग्निशामन शुल्क, वृक्ष लागवड ई शुल्क आकारणी करता विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३) देहू नगरपंचायत हद्दीत उभारले जाणारे होडींग परवानगी शुल्क व जागा निश्चित करणे करीता विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४) देहू शहरातील आरोफिल्टर ताब्यात घेवून लिलाव पध्दतीने देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५) देहू नगरपंचायती करिता विविध योजनांतर्गत मंजूर कामांना नेमलेल्या PMC ना कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत

१६) तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातुन बांधण्यात आलेल्या भूमिगत गटार योजना (STP PLANT)मधीलत्रुटी दूर करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमाने बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७) नवनिर्मित देहू नगरपंचायत हद्दीत नविन जिल्हा रुग्णालय इमारती करिता सर्व्हे नं. ९७ (शासकीय गायरान) जागा मागणी करणेबाबत.

१८) देहू नगरपंचायत येथील ग्रामपंचायत कालीन कर्मचारी समावेशण करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)अंतर्गत देहू नगरपंचायत शहराच्या सविस्तर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल /आराखडा बनविणेसाठी तज्ञ/अनुभवी तांत्रिक सल्लागाराची /एजन्सीचे नेमणूक करणे.

२०) देहू शहराची वाढती लोकसंख्या तसेच पुढील ३० वर्षाचा विचार करून देहू शहराचा शहर विकास आराखडा (city development plan-CDP)आणि शहर स्वच्छता आराखडा (citysanit ation plan-csp) बनविणेसाठी तज्ञ/अनुभवी तांत्रिक सल्लागाराची /एजन्सीचे नेमणूक करणे.

२१) देहू नगरपंचायती मधील फटाके स्टॉल जागा निश्चिती करणे आणि परवाना शुल्क निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२) देहू नगरपंचायत वार्षिक कालावधीकरिता फ्लेक्स, बोर्ड, पम्पलेट, स्टीकर पुरवठा करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३) देहू नगरपंचायत हदीतील पशुवैद्यकीय दवाखान्याला तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२४) देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायरान जागेतील वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करून देणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

२५) देहू नगरपंचायत करिता स्वतंत्र बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्याला अंतिम मान्यता देणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

२६) देहू शहरातील भटकी कुत्रे पकडणेकामी टेंडर लावणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

२७) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विद्युत वाहिनी भूमिगत करताना खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

Scanned with OKEN Scanner

२८) देहू नगरपंचायत कार्यालय, व्यवसायिक गाळे, वैकुंठ गमन परिसर येथे थ्री फेजचे नविन लाईट मीटर घेणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

२९) प्रभाकर टिळेकर यांचे घर ते पांडुरंग बबन टिळेकर यांचे घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३०) प्रभाग क्र.६ मध्ये स्वागत कमानी उभारली बाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

३१) प्रभाग क्र.६ मध्ये अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव १ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. मागील सभेचे प्रोसिडिंग हे पुढील सभेपर्यंत पूर्ण होत नाही ही खूपच गंभीर बाब असून त्यामुळे सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.सभागृहात चार्चीले जाणारे सर्व विषय विहित मुदतीतपूर्ण करण्याची जबाबदारी संबधित विभागप्रमुख व सभा अधीक्षकांची असेल. सभेचे प्रोसिडिंग हे ८ ते १० दिवसात पूर्ण न केल्यास सदर विषयाशी संबधित विभाग प्रमुख व सभा अधीक्षक यांचा १५ दिवसाचा पगार कपात करण्यात यावा अशी सूचना पूनम काळोखे यांनी दिली तसेच सर्व कर्मचाऱ्यांना पुढील सर्व सभेसमोर उपस्थित राहणेस कळविण्यात यावे अशी सूचना योगेश काळोखे यांनी सभागृह दिली . स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ पुनम वि. काळोखे
अनुमोदक :- सौ. पुजा भ. दिवटे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.२ :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव २ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत .

सुचक :- सौ. मिना रा. कुऱ्हाडे
अनुमोदक :- सौ. सपना अ. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व पथविक्रेते/ फेरीवाले मिळून पथविकेता समिती स्थापन करणेबाबत विचार विमिनय करून निर्णय घेणे

ठराव ३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. राष्ट्रीय फेरीवाले धोरण २००९ मधील परिच्छेद ४.५.१ मध्ये शहर फेरीवाल समितीची रचना विहित केली आहे. त्यामुसार सदर समितीवर एकूण चार प्रकारच्या विविध प्रवर्गातील प्रतिनिधी सदस्य म्हणून नियुक्त करावयाची आहे.सदर समितीवर नियुक्त कारवयाच्या विविध प्रवर्गातील सदस्य व त्यांची संख्या पुढीलप्रमाणे विहित केली आहे.

शहर फेरीवाला समिती.

| अ.क्र. | सदस्यचा प्रकार (प्रवर्ग) | सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | स्थानिक प्राधिकरण नियोजन प्राधिकरण पोलीस व इतर अशा प्रवर्गाचे प्रतिनिधी. | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०%इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |
| २. | फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान ४०%इतके सदस्य फेरीवाला संघटनेचे प्रतिनिधी असतील. |
| ३. | रेसिडेंन्ट वेलफेअर असोसिएशन्स,समदाय आधारित संघटना (कम्युनिटी बेस ऑर्गनायझेशन) | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०%इतके सदस्यया प्रवर्गातील असतील. |
| ४. | इतर नागरी (सिव्हील) संस्था संघटना NGO,व्यवसायिक समूहातील प्रतिनिधी (जसे वकील,डॉक्टर,नगर रचनाकार, आर्किटेक्चर,इत्यादी.) व्यापारी व बाणिज्य समूहाचे प्रतिनिधी,शेड्युल बँकेचे प्रतिनिधी व महत्वाचे नागरिक | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०%इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |

शहर फेरीवाला समितीवरील नियुक्त करावयाच्या फेरीवाला संघटना,रेसिडन्सी वेलफेअर असोसिएशन व इतर नागरी संस्था संघटना या प्रवर्गातील एकूण सदस्यांच्या सदस्यांच्या संस्थेपैकी किमान १/३ सदस्य या महिला असल्या पाहिजेत.

तरी शासन नियमानुसार समिती स्थपना करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- योगेश बा. परंडवाल

अनुमोदक :- मयुर द. शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत दिनांक .
१७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र. ४:- देहू नगरपंचायत हद्दीमध्ये नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत देहू नगरपंचायत हद्दीत विविध कामे घेणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ४:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत देहू नगरपंचायत हद्दीत खालील प्रमाणे कामे करण्यास यावी

1) नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी कायम राहावी यासाठी बंधारे बांधणे.

* सन १९८० मध्ये इंद्रायणी नदीवर बांधलेल्या बोडकेवाडी व खालुंब्रे बंधारा असे दोन बंधारे यामुळे पाण्याची पातळी कायम राहण्यास मदत होते.

* यापैकी बोडकेवाडी येथील बंधाऱ्यावरुन देहू शहराकरिता पाण्याची उचल करण्यात येते. बोडकेवाडी येथील बंधारा हा जिर्ण झाला असून बऱ्याच ठिकाणी बंधाऱ्यातून पाण्याची गळती होत आहे. तसेच हा बंधारा पाण्याच्या प्रवाहामुळे कधीही पडु शकतो, त्यामुळे शहराचा पाणी पुरवठा बंद होण्याची दाट शक्यता निर्माण होते.

* तसेच इंद्रायणी नदी पात्रातील इंटेक वेल (Intake Well) ही पावसाळयात पाण्याच्या प्रवाहामुळे पडली आहे. याकरीता अंदाजे २५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

* सदर बंधाऱ्याचे नुतणीकरण करणे अत्यावश्यक असून या करिता अंदाजित खर्च ३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

* वरीलप्रमाणे इंद्रायणी नदी पात्रातील पाण्याची पातळी कायम राखणेकरीता तसेच देहू शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेकरीता अंदाजित रुपये ३ कोटी २५ लक्ष प्राप्त नगरपंचायतीमार्फत आवश्यक ती कामे पुर्ण करुन घेण्यात येतील.

2) नागरी घनकचरा व्यवस्थापन .

*देहू नगरपंचायत कार्यालयाकडे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता मौजे देहू येथील स.नं. ९७ मधील गायरान जागेत एकुण ५ एकर इतकी जागा मिळणेसाठी मा. जिल्हाधिकारी सो., पुणे यांचेकडे मागणी केलेली आहे.

* तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता व प्रस्तावित जागेच्या भूसंपादनाकरीता अंदाजे २ कोटी इतका निधी अपेक्षित आहे.

३) नदीचा किमान पर्यावरणीय प्रवाह अबाधित ठेवणे.

* देहू शहराच्या हद्दीत इंद्रायणी नदीचा पर्यावरणीय प्रवाह सध्यस्थितीत सुरळीत आहे.

* यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविक भक्तांना स्नान करण्यासाठी पुरेशा प्रमाणात वेळोवेळी आवश्यकतेनुसार पाटबंधारे बिभागाकडून धरणातून पाण्याचा जादाचा साठा सोडण्यात येतो.

*जादा दाबाने सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे नदी पात्रात वाहून आलेली जलपर्णी काढणायचे काम देनु नगरपंचायत कार्यालायामार्फत करण्यात येते.

4) यात्रेच्या दरम्यान स्वच्छता गृहे ,स्नानगृहे उपलब्ध करून देणे.

*शहरातील सार्वजनिक शौचालये व्यवस्था

* सार्वजनिक शौचालये -८ (१०० सीट्स)

*Pay & Use सुलभ शौचालये -२ (१०० सीट्स)

* एकूण –शौचालये १०(२०० सीट्स)

Scanned with OKEN Scanner

* यात्रा कालावधीत वरील सर्व शौचालये आवश्यक सुविधांसह भाविकांना २४ तास उपलब्ध करून दिले जातात .

* तसेच यात्रा कालावधीत भाडे तत्वावर ९०० ते १००० मोबाईल शौचालयाची व्यवस्था करून दिली जाते.

5) नागरी वस्त्या मधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रीयेसाठी यंत्रणा उभारणे.

* शहरातील (नवीन समाविष्ट क्षेत्रासह) दैनंदिन सांडपाणी ४ MLD

* यापैकी प्रक्रिया होणारे सांडपाणी - ३ MLD

* देहू शहरात तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत अंदाजे ३ एम.एल.डी. क्षमतेचे मलनिसारण प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.

* सद्यस्थितीत सांडपाण्यावर प्रक्रिया होणारी पुर्ण यंत्रणा ही म.जी. प्रा. पुणे आणि सा.बा.वि. पुणे यांचे ताब्यात आहे. STP प्लॅंट करीता टाकण्यात आलेली ड्रेनेजलाईन शहरात विविध ठिकाणी लिकेज आहेत, तसेच बऱ्याच ठिकाणचे चेंबर नादुरुस्त असून तुंबलेले आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असून दुर्गंधी पसरत आहे.

* नदी पात्राजवळील चेंबर लिकेज झाल्यामुळे सांडपाणी इंद्रायणी नदीच्या पात्रात मिसळून नदीचे पाणी प्रदुषित होत आहे. यामुळे वारकरी व भाविकांकडुन वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

* शहरातील बऱ्याच ठिकाणी चेंबर मधील अंतरे नियमाप्रमाणे सोडण्यात आलेली नाहीत. त्यामुळे वारंवार चेंबर तुंबले असता कामे करुन घेणे कठीण होते.

*सद्यस्थितीत STP यंत्रणा सुरळीत करुन घेण्याच्या अनुषंगाने देहू नगरपंचायती आवश्यकतेनुसार नादुरुस्त असलेल्या ड्रेनेजलाईन व चेंबर दुरुस्ती करणेकरीता कामाचे अंदाज तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याकरीता अंदाजे ३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

*वरीलप्रमाणे वारकरी भाविक व नागरिकांच्या तक्रारी दूर करण्याची दृष्टिने अंदाजित रुपये प्राप्त झाल्यास नगरपंचायतीमार्फत आवश्यक ती कामे पुर्ण करुन घेण्यात येतील.

* तसेच देहू नगरपंचायत नवीन झाल्यापासून माळीनगर व बोडकेवाडी मधील क्षेत्र देहू नगर हद्दीत समाविष्ठ झाल्याने व भविष्यात वाढत असलेली लोकसंख्या पाहता सदर योजनेतून अ एम.एल.डी. STP प्लॅंट चे काम प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

6) STP मलनि:सारण प्रकल्पाबाबत.

- STP Technology - Activated Sludge Process (ASP)
- मलनिसारण प्रकल्पाकरीता ड्रेनेजलाईन टाकणेचे काम एकुण ३० कि.मी. इतके काम पुर्ण करण्यात आले आहे.
- मलनिसारण प्रकल्पाचे बांधकामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयाकडुन सन २०१५ मध्ये ३ एम.एल.डी. इतक्या क्षमतेचा STP प्लॅंट बांधकाम करण्यात आलेले आहे.
- देहू शहरात वाढते नागरिकीकरण व वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेता भविष्यात शहरात Sewerage Network वाढविणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

- त्याअनुषंगाने देहू शहराच्या हद्दीत वाढीव क्षेत्रात Sewerage Network चे डी.पी. आर. (DPR) करणेचे काम सुरु आहे.

7) नदी घाटाचे सौदर्यीकरण व वनीकरण करणे

- देहू शहरामध्ये पान दरवाज्या ते वैकुंठ मंदिरापर्यंत नदी घाटाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
- नदी घाटाचे सौदर्यीकरण वाढविण्यासाठी नदी घाटाची दैनंदिन साफ सफाई करणे, नदी पात्रात भाविकांसाठी बोटची सुविधा करणे, इत्यादी महत्वपुर्ण बाबी करण्यात आलेल्या आहेत.
- याच प्रमाणे नदी पात्राजवळ देहू नगरपंचायतीच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले असून सदर वृक्षाचे संवर्धन व संगोपण करण्याची कार्यवाही दैनंदिन करण्यात येते.

8) देहू नगरपंचायत हद्दीत असणाऱ्या इंद्रायणी नदी वरील पुलांच्या कठड्याला लोखंडी जाळी लावणे.

* झेंडे पेट्रोल पंप शेजारील पूल, चौदा टाळकरी कमान शेजारील जुना व नविन फुल, गाथा मंदिर बायपास वरील पूल ४ चार पुलावर लोखंडी जाळी टाकणे काम करण्यात यावे.

सुचक :- सुधीर सु. काळोखे

अनुमोदक :- सौ. पुजा सु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ५- देहू आळंदी रोड ते मुख्य कमान ते तळवडे हॉस्पीटल रस्ता रुंदीकरण करणे व डावी व उजवी बाजू बंदिस्त भूमीगत गटार बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्यण घेणे.

ठराव क्र. ५- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत देहू आळंदी रोड ते मुख्य कमान ते तळवडे हॉस्पीटल या रस्त्याची फार मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणीच्या परिसरातील नागरिकांनी देहू नगरपंचायतकडे सदर रस्त्यावरील वाढलेल्या विविध समस्याबाबत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. तसेच सदर रस्त्यावर पावसाचे पाणी साचत असून डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या तक्रारी केलेल्या आहेत. त्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण करणे व सदर रस्त्यावर डावी व उजवी बाजूच्या ठिकाणी बंदिस्त गटार टाकणे आवश्यक आहे. याकरीता देहू नगरपंचायतकडुन सदर रस्त्यांचे रुंदीकरणाचे कामासाठी तसेच सदर रस्त्याच्या डावी व उजवी बाजू मध्ये बंदिस्त गटार करण्यासाठी सदर कामाचे अंदाजपत्रके तयार करुन व त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून तसेच शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेवून सदरचे कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश ह. काळोखे

अनुमोदक - पुनम वि. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ६- मुख्य कमान ते परंडवाल चौक ते राधाकृष्ण मंगल कार्यालय रस्ता रुंदीकरण करणे व डावी व उजवी बाजू बंदिस्त भूमीगत गटार बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ६- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत मुख्य कमान ते परंडवाल चौक ते राधाकृष्ण मंगल कार्यालय या रस्त्याची फार मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणीच्या परिसरातील नागरिकांनी देहू नगरपंचायतकडे सदर रस्त्यावरील वाढलेल्या विविध समस्याबाबत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. तसेच सदर रस्त्यावर पावसाचे पाणी साचत असून डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या तक्रारी केलेल्या आहेत. त्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण करणे व सदर रस्त्यावर डावी व उजवी बाजूच्या ठिकाणी बंदिस्त गटार टाकणे आवश्यक आहे. याकरीता देहू नगरपंचायतकडुन सदर रस्त्यांचे रुंदीकरणाचे कामासाठी तसेच सदर रस्त्याच्या डावी व उजवी बाजू मध्ये बंदिस्त गटार करण्यासाठी सदर कामाचे अंदाजपत्रके तयार करुन व त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून तसेच शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेवून सदरचे कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश ह. काळोखे

अनुमोदक - पुनम वि. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ९- संत तुकाराम विद्यालय कन्या शाळेसाठी ड्रेनेजलाईन घेणेबाबत विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ९- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत संत तुकाराम विद्यालय कन्या शाळेसमोर ड्रेनेजलाईन नसल्याने सदर ठिकाणी नवीन ड्रेनेजलाईनचे काम करणे आवश्यक आहे. सदर शाळेकडुन विद्यार्थ्यांना होणाऱ्या अडचणीबाबत नगरपंचायतीस तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

सदर शाळेच्या ठिकाणी नवीन ड्रेनेजलाईन टाकणेसाठी व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीस व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सदरची जागा ताब्यात देण्यात यावी. तसेच जागेचे मा. हस्तांतर घेऊन काम करण्यात यावे

सुचक - योगेश ह. काळोखे

अनुमोदक - सपना म. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय नं.१० :-** देहू नगरपंचायत हद्दीमध्ये तुंबलेले मलनि:सारण वाहिनी,चेंबर इ.ठिकाणी आवश्यक कामे करणेकरिता निविदा पद्धतीने जेट मशीन व सक्शन मशीन कंत्राटी पद्धतीने घेणे बाबत.

ठराव १० :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून २०१५-१६ संपूर्ण देहू शहर हद्दीत भुयारी गटर योजनेचे काम केले असून विविध भागतील कामे अपूर्ण स्वरुपाची असल्याने वारंवार चेंबर व गटर लाईन चोकअप होऊन सदर सांडपाणी नागरिकांच्या घरात व तसेच रोडवरती येत आहे. त्यामुळे सदर भागातील नागरिक, नगरसेवक तसेच पत्रकार यांच्या कडून वारंवार तक्रारी व सूचना प्राप्त होत आहेत. काही प्रभागामध्ये ड्रेनेजलाईन टाकणेचे काम अर्धवट स्थितीत आहेत. तसेच काही ठिकाणी नादुरुस्त आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी ड्रेनेजलाईन तुंबलेली आहे. अशा ठिकाणी जेट मशिनच्या सहायाने प्रेशर देवून तुंबलेली गटारे साफ करणे आवश्यक आहे. तसेच तेथील घान पाणी सक्शन मशिनच्या सहायाने बाहेर काढणे आवश्यक आहे. देहू नगरपंचायत कार्यालयाकडे जेट मशिन व सक्शन मशिन नसल्याने निविदा प्रक्रिया करुन भाडेपद्धतीने सदरच्या मशिनरी पुरवठा करुन कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. याकरिता निविदा प्रक्रिया करुन संबंधित कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

त्यामुळे देहू शहर हद्दीतील सद्यस्थिती पाहता भुयारी गटर योजनेमध्ये असलेल्या त्रुटी दूर करणे करीता देहू नगरपंचायत कार्यालयाकडे जेट मशिन व सक्शन मशिन नसल्याने निविदा प्रक्रिया करुन भाडेपद्धतीने सदरच्या मशिनरी पुरवठा करुन कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. याकरिता निविदा प्रक्रिया करुन संबंधित कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- योगेश बा. परंडवाल

अनुमोदक :- स्वप्नील म. हगवणे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ११- देहू नगरपंचातीची विकास योजना तयार करणेकरीता विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ११- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीची स्थापना सन २०२० या कालावधीत झालेली आहे. त्याअनुषंगाने देहू शहरातील माळीनगर, बोडकेवाडी, विठ्ठलनगर इत्यादी क्षेत्रातील अनेक महसूली क्षेत्र हे देहू नगरपंचायत हद्दीत नव्याने समाविष्ट झालेले आहेत. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत शहरासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९ / प्र.क्र. ३०३ / १८ / शुद्धीपत्रक/ नवि -१३ दिनांक २५/०१/२०१९ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये नगरपंचायतीच्या क्षेत्रांसाठीच्या विकास योजना ही भौगोलिक माहिती प्रणाली (Georalphical Information System) GIS वापरुन द्रुतगती पद्धतीने तयार करणेबाबत धोरणात्मक निर्णय केलेला आहे.

देहू नगरपंचायतीची विकास योजना तयार करणेसाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९ / प्र.क्र. ३०३ / १८ / शुद्धीपत्रक/ नवि -१३ दिनांक २५/०१/२०१९ मधील तरतुदीनुसार मा. नगर रचना संचालनालयाच्या सनियंत्राणाखाली निधी उपलब्ध होणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेस व या कामी होणाऱ्या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश ह. काळोखे

अनुमोदक - योगेश का. परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,<br>
देहू नगरपंचायत, देहू<br>
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. १२- देहू नगरपंचायत हद्दीतील जोते तपासणी, झोन दाखला, भोगवटा प्रमाणपत्र, राडारोडा शुल्क, अग्निशमन शुल्क, वृक्ष लागवड इ. शुल्क आकारणी करीता विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १२- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये विविध प्रमाणपत्रासाठी आकारावयाच्या शुल्काकरीता खालील दर मंजूर करण्यात आलेले आहेत.

१. जोते तपासणी दाखला देणेसाठी आकारावयाचे शुल्क :- **रु. १०/- प्रती. स्के.मी. प्रमाणे**

२. मुदतीत मुदतवाढ न घेतलेस आकारावयाचे शुल्क :- **मुदतीतनंतर प्रती ३००/- प्र.महिना शुल्क**

३. भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी आकारणी रक्कम शुल्क :- **रु. १०/-प्रती.स्के.मी. प्रमाणे (बांधकाम क्षेत्र)**

| | |
|---|---|
| ४.इमारत पाडणे ना हरकत दाखला | रु. ५००/- |
| ५.बांधकाम पाडल्याचे प्रमाणपत्र | रु. ५००/- |
| ६.झोन दाखला | रु. ५००/- |
| ७.भाग नकाशा | रु. ५००/- |
| ८.आर्किटेक्ट / इंजिनिअर / लायसन्स फी | रु. १०००/- प्र.वर्ष. |
| ९.सुपरवायझर लायसन्स फी | रु. १०००/- प्र.वर्ष. |
| १०.राडारोडा शुल्क | रु. १०/- प्र.स्के.मी. (भूखंड क्षेत्र) |
| ११.अग्निशमण शुल्क | रु. ५०००/- |
| १२.वृक्ष लागवड शुल्क | रु. १५००/- |

सबब,वरील प्रमाणे नगरपंचायत देहू क्षेत्रासाठी दर आकारणी निश्चित करणेत येत आहे. त्याचप्रमाणे उपरोक्तनुसार निश्चित केलेले दर कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

सुचक - योगेश व. काळोखे

अनुमोदक - आदित्य नि. टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

**मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

विषय क्र. १३- देहू नगरपंचायत हद्दीत उभारले जाणारे होर्डिंग परवानगी शुल्क व जागा निश्चीत करणेकरीता विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. १३- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत अनेक ठिकाणी विनपरवानगी अनाधिकृतपणे होर्डिंग उभारण्यात आले आहेत. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे शहरातील उभारण्यात येणाऱ्या होर्डिंग साठी सक्षम प्राधिकरणाकडे परवानगी साठी निश्चित केलेल्या शुल्काचा भरणा करुन व परवानगी घेवूनच आवश्यक त्या निश्चीत केलेल्या ठिकाणी होर्डिंगसाठी परवानगी देणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या व येणाऱ्या होर्डिंगसाठी शुल्क आकारणी करणेबाबत या सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

| जागा तपशिल / ठिकाण तपशिल | प्रमाण | शुल्क |
|---|---|---|
| स्ट्रीटलाईट पोलवर लावण्यात येणार बोर्ड | ३X२ फुट साठी | रु. २/-प्रति दिन प्रती बोर्ड |
| | १०X१० स्कु.फुट व त्यापैक्षा मोठे | रु. १/- रु. प्रति स्के.फुट प्रति दिन |
| कायमस्वरुपी होर्डिंग | -- | रु. २०,०००/- प्रति वार्षिक शुल्क |
| खाजगी जागेत लावण्यात येणारे बॅनर / होर्डिंग | -- | परवानगी करीता विहित नमुन्यात नगरपंचायत कार्यालयाकडे अर्ज करुन व आवश्यकतेनुसार विहित शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. |
| टिप - विनापरवाना बॅनर / फ्लेक्स लावणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. | | |

देहू नगरपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या व येणाऱ्या होर्डिंगसाठी शुल्क आकारणी करणेबावत सर्वानुमते या ठरावान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - योगेश ना. परंडवाल

अनुमोदक - योगेश ह. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१४ :- देहू शहरातील आरोफिल्टर ताब्यात घेवून लिलाव पध्दतीने देणेबाबत विचार विनिम करून निर्णय घेणे.

ठराव १४ :- सदरचा विषय मे.सभेसमोर बाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ग्रामपंचायत असताना कंपन्यांच्या CSR फंडातून काही शासकीय व खाजगी ठिकाणी R O फिल्टर प्लॅन्ट उभारले आहेत.त्याचा संपूर्ण ताबा हा एका खाजगी संस्थेकडे असून त्यातून मिळणारे आर्थिक उत्पन्न ही ती संस्थाच घेते.त्यापासून नगरपंचायतीला कोणतेही आर्थिक उत्पन्न प्राप्त होत नाही. कंपन्यांच्या CSR फंडातून उभारलेले R O फिल्टर प्लॅन्ट नगरपंचायतीच्या ताब्यात घेऊन वार्षिक लिलाव पद्धतीने चालवण्यात देण्यात यावा.

तसेच खाजगी R O फिल्टर प्लॅन्ट आहेत त्यांनी नगरपंचायतीचे ना-हरकत घेणे व त्याचे दरवर्षी नुतनीकरण करणे बंधनकारक करणे तसेच त्यांना वार्षिक कर आकारण्यात करण्यात यावा.तसेच खाजगी R O फिल्टर प्लॅन्ट मालकांनी पाण्याचे नमुने वारंवार शासकीय प्रयोगशाळेतून तपासून घेणे बंधनकारक आहे. अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सुधीर सु. काळोखे

अनुमोदक :- योगेश बा. परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१५ :- देहू नगरपंचायतीकरीता विविध योजने अंतर्गत मंजूर कामांना नेमलेल्या PMC ला कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १५- सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नव निर्वाचित नगरपंचायत असून नगरपंचायतीची स्थापना सन २०२० या कालावधीत झालेली आहे. त्याअनुषंगाने शहरातील अनेक महत्वाचे महसूली क्षेत्र देहू नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झालेली आहेत. तसेच शासनामार्फत महत्वाच्या जबाबदारीचे कामे नगरपंचायतीस देण्यात आलेली आहेत. देहू नगरपंचायत हद्दीतील विविध अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणेची कामे प्रलंबित होती.

देहू नगरपंचायत कार्यालयामार्फत देहू शहराच्या कार्यक्षेत्रात महत्वाचे अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणेसाठी शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान योजना तसेच नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत विविध कामे प्रस्तावित केली होती. त्यानुसार प्रस्तावित केलेल्या कामांचे अंदाजपत्रके तयार करणेकामी तांत्रिक सल्लागार देहू नगरपंचायतीकडे नव्हता शहरातील विविध विकास कामे शासनाच्या विविध योजनांतून करून घेण्यास कामांचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता मिळवणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रके तयार करणेसाठी वास्तुशिल्प असोसीएट तर्फे श्री मंगेश शिंदे या यांना प्रशासकांच्या आदेशानुसार कार्यादेश देवून विविध योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या कामांचे अंदाजपत्रके तयार करण्याचे कामकाज पुर्ण करुन घेतले आहे. तसेच सदर कामांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे या विभागाची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेतली आहे.

वास्तुशिल्प असोसीएट तर्फे श्री मंगेश शिंदे यांनी पुर्ण केलेल्या कामकाजा संदर्भात देहू नगरपंचायत कार्यालयाकडे देयक मिळणेसाठी मागणी केली आहे. सबब सदर प्रकरणी व परिस्थितीचा विचार करता संबंधित कंत्राटदाराचे प्रलंबित देयक नियमानुसार अदा करणेसाठी होणा-या अर्थिक खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे

सुचक :- पुनम वि. काळोखे

अनुमोदक योगेश बा. परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

विषय १६ :- तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातुन बांधण्यात आलेल्या भूमिगत गटार योजना (STP PLANT) मधीलत्रुटी दूर करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमाने बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला.देहू ग्रामपंचायत असताना तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून देहू हद्दीत अनेक कामे करणयात आली त्यामध्ये प्रामुख्याने ते म्हणजे संपूर्ण देहू शहरात भूमिगत गटर योजनेचे काम करण्यात आले.भूमिगत गटर योजनेचे काम करताना ते निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. भूमिगत गटर बांधताना दोन चेंबर मध्ये जे ठराविक अंतर हवे असते तसे न करता दोन चेंबर मधील अंतर हे खूप मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आले आहे. चेंबर मधील अंतर जास्त असल्याने ड्रेनेज लाईन मधील चोकअप जेट मशिनच्या सहाय्यने ही निघत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वारंवार भूमिगत गटर चोकअप होत आहे. ठिकठिकाणी ड्रेनेज लाईन ह्या चेंबर लाईनला जोडलेल्या नसल्याने सांडपाणी रस्त्यावर येऊन रोगराई पसरत आहे. त्यामुळे ड्रेनेज लाईन संदर्भात नगरपंचायातीकडे वारंवार तक्रारी येत आहेत. तसेच अनेक वेळा महिलांचा मोर्चा ही आला आहे.त्या अनुषगांने उपाययोजना करणेकामी तांत्रिक सल्लागार नेमाणे गरजेचे आहे.

तरी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातुन बांधण्यात आलेल्या भूमिगत गटार योजना (STPPLANT) मधीलत्रुटी दूर करणेसाठी संपूर्ण देहू नगरपंचायत हद्दीतील ड्रेनेज लाईनचा सर्व्हे करून किती ठिकाणी ड्रेनेज लाईन चेंबरला जोडल्या नाहीत व लाईन नाहीत तसेच चेंबर बांधणे आवश्यक आहे. त्याकामी पाहणी करणे कामी व त्यातील त्रुटी दूर करणे कामी तसेच शहराचा सर्व्हे करून अहवाल तयार करून वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमण्यात यावा अशा स्वरुपाची चर्चा होऊन यासाठी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- ज्योती गो. टिळेकर

अनुमोदक :- सपना ज. मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभानुसार

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. १७- नव निर्वाचित देहू नगरपंचायत हद्दीत नवीन जिल्हा रुग्णालय इमारती करीता स.नं. ९७ (शासकीय गायराण) जागेची मागणी करणे.

ठराव क्र. १७- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जिल्हा रुग्णालयाकरीता प्रशस्त इमारत नसल्याने रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यास अडचणी येत आहेत. देहू शहरातील स.नं. ९७ या शासकीय जागेमध्ये नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीचे काम करणे शक्य आहे. सदर इमारतीकरीता एकुण ५ एकर जागेची आवश्यक आहे. सदरची जागा ही शासकीय गायराण असल्याने सदर गायराण जागेवर नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीकरीता शासनास जागा मागणी प्रस्ताव सादर करणे अत्यावश्यक आहे. याकरीता नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीकरिता एकुण ५ एकर जागा मागणीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे, सदर जमिनीची शासकीय मोजणी करणे व अनुषंगीक सर्व कामे करणेसाठी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश व. काळोखे

अनुमोदक - सुधीर सु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

[signature]

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१८ :- देहू नगरपंचायत येथील ग्रामपंचायत कालीन कर्मचारी समावेशन करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव १८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला असता त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला शासन राजपत्र दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी देहू ग्रामपंचायत मध्ये रूपांतर झाले शासन नियमनुसार – महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय एमयूपी-२०१७/ प्र.क्र.१४/ नवी १८४ था मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दि. ०८ डिसेंबर ,२०२० अन्वये तत्कालीन देहू ग्रामपंचायत मध्ये काम करणाऱ्यासर्व कर्मचाऱ्यांचे समावेश देहू नगरपंचायत कर्मचारी आस्थापनावर करणे अत्यावश्यक आहे. याबाबत मा.विभागीय आयुक्त कार्यालय तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडून वारंवार पत्र व्यवहार होत आहे. तत्कालीन देहू ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे माहिती मा.गटविकास अधिकारी हवेली यांचेकडून सहपत्र १ च्या स्वरूपात प्राप्त होते. सहपत्र १ या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव पुढील कार्यवाही करता वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात .येतात. सदर प्रस्ताव पाठवण्याकरीता नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव अत्यावश्यक आहे. तरी सभागृहाने ठराव मंजूर केल्यास देऊ नगरपंचायत प्रशासनाला पुढील कार्यवाही लवकरात लवकर करणे शक्य होईल असे मत मुख्याधिकारी यांनी सभागृहात मांडले.

यावर गटनेते प्रस्ताव पाठवताना कायमस्वरूपी आणि हंगामी अशा सर्व कामगारांचे प्रस्ताव एकत्रित पाठवण्यात यावे. तसेच मा.अध्यक्षा स्मितताई चव्हाण व मा.नगरसेविका पूनमताई काळोखे यांनी ग्रामपंचायत मधून नगरपंचायत मध्ये आलेले कर्मचारी वर्ग त्यामध्ये पाणीपुरवठा कर्मचारी, ऑफिस मधील कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे तयार करून समावेशनाकरिता पुढे पाठविण्यात यावी असे सुचविले,

यावर सर्वानुमते असे ठरले कि, सहपत्र १ नुसार मा.गटविकास अधिकारी हवेली यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव पाठविण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सुचक :- सौ.पूनम विशाल काळोखे

अनुमोदक :- श्री.योगेश हनुमंत काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. १९- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत देहू नगरपंचायत शहराच्या सविस्तर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल / आराखडा बनविणेसाठी तज्ञ / अनुभवी तांत्रिक सल्लागाराची/ नेमणूक करणे.

ठराव क्र. १९- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू ही नव निर्वाचित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीकडे शहरातील संकतिल झालेल्या कचऱ्यावर वर्गीकरण करण्यासाठी व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी करण्यात आलेला नाही. त्यामुळे संकलित केलेल्या कचऱ्यांचे नियोजन करणे व विल्हेवाट लावणे शक्य होत नाही. त्याअनुषंगाने शहरातील कचऱ्याचे सुयोग्य नियोजन होण्यासाठी शहराचा सविस्तर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल / आराखडा तयार करणे आवश्यक आहे. याकरीता देहू नगरपंचायती कार्यालयामार्फत सदर आराखडा तयार करण्यासाठी ई-निविदा / निविदा प्रक्रिया करुन तज्ञ व अनुभवी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करुन घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - सौ. रसिका स्व. काळोखे

अनुमोदक - सौ. पुजा सु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय नं.२१:-** देहू नगरपंचायती मधील फटाके स्टॉल जागा निश्चिती करणे आणि परवाना शुल्क निश्चित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने फटके स्टॉल वैकुंठ गमन मंदिर शेजारी घाट परिसर येथे स्टॉल लावण्यासाठी जागा निश्चीत करण्यात यावी. सदर स्टॉलसाठी ना हरकत देण्यासाठी रक्कम रु. २५००/- इतकी फी आकारण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सुचक :- मयूर दे. शिवशरण

अनुमोदक :- पुजा अ. दिवटे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभानुसार

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.२२ :- देहू नगरपंचायत वार्षिक कालावधीकरिता फ्लेक्स, बोर्ड, पम्पलेट, स्टीकर पुरवठा पुरवठा करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव २२:- नगरपंचायतीच्या परवानगी घेऊन देहू शहरात फ्लेक्स, बोर्ड, पम्पलेट, स्टीकर लावणे करीता नगरपंचायतीने काही जागा निश्चित केलेल्या आहेत.त्या पुढीलप्रमाणे मुख्य कमान चौक,चौदा टाळकरी कमान चौक,भैरवनाथ चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,चांदणी चौक,परंडवाल चौक,काळोखे पाटील चौक, बाणेर नागरी पतसंस्था, विठ्ठल मंदिरा शेजारी,सरकारी गायराणाकडे जाणारा रस्ता,संत तुकाराम मंडळ तालीम शेजारी,युनिकेअर हॉस्पिटल शेजारी,संत तुकाराम विद्यालय शेजारी,रामकृष्ण मोरे तालमी शेजारीया करिता खालील प्रमाणे शुल्क आकारणी केली आहे.

सुचक :- आदित्य चि. टिळेकर

अनुमोदक :- मयुर द. शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभानुसार

Scanned with OKEN Scanner

मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.२३ :- देहू नगरपंचायत हदीतील पशुवैद्यकीय दवाखान्याला तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव २३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. डॉ. हंसराज हेंबरे पशुवैद्यकीय अधिकारी,देहू यांच्या दि.६/१०/२०२२ रोजीच्या अर्जानुसार देहू नगरपंचायत हद्दीत पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था झाली असूने तेथे येणाऱ्या जनावरांच्या आरोग्याची योग्य अशी काळजी घेणेकरता गावासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यात ची गरज आहे. अंदाजे देहू नगरपंचायत हद्दीत -------------जनावरे असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने देहू नगरपंचायत हद्दीत पशुवैद्यकीय दवाखान्याला इतर कोठेही जागा उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात जुनी ग्रामपंचायत इमारती बाहेर पत्रा शेड मारून त्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला जागा देण्यात यावी. अशा स्वरुपाची चर्चा होऊन यासाठी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- आदित्य भि. शिंदेकर

अनुमोदक :- योगेश बा. परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक -24
दिनांक -17/10/2022

ठराव क्रमांक - 24
दिनांक - 17/10/2022

देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायरान विठ्ठलवाडी येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात तक्रारी देहू नगरपंचायतीस प्राप्त होत आहेत. सदर ठिकाणचा पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकून तातपुरत्या स्वरुपात Standpole उभा करून नागरिकांची पिण्याच्या पाण्याच्या सोय करून देता येईल.तरी सदर ठिकाणी पाईपलाईन करणे कामास व Standpole उभा करणे या कामाला ला हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च सण 2022-23 नगरपंचायत फंडातून या लेखा शिर्षातून करण्यात यावा .

सूचक :सौ. पूजा अ. दिवटे

अनूमोदक :श्री. मयूर द. शिवशरण

Scanned with OKEN Scanner

मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.२५ :- देहू नगरपंचायत करिता स्वतंत्र बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्याला अंतिम मान्यता देणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

ठराव क्र. २५ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.देहू नगरपंचायत करिता बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्याला मागवण्यात आले असून बोधचिन्ह हे श्री संत तुकाराम महाराज यांचे फोटो व त्यामागे कमान असा असून ब्रीदवाक्य "तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा " यास ही सभा अंतिम मान्यता देत आहे. देहू नगरपंचायत मार्फत बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य यांचे अनावरण करून देहू शहरातील नागरिकांना कळण्यासाठी त्याचा अनावरणाचा कार्यक्रम घेण्यात यावा. अशा स्वरुपाची चर्चा होऊन यासाठी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- योगेश ड काळोखे

अनुमोदक :- रसिका रव काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. २६ :- देहू शहरातील भटकी कुत्रे पकडणेकामी टेंडर लावणेबाबत विचार विमिनय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.२६:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.देहू नगरपंचायत हद्दीमध्ये सध्यस्थितीत भटक्या कुत्रायांचे प्रमाण खूपच वाढले आहे.देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे भाविक भक्त यात्रेकरू याची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते.त्यामुळे वारकरी भाविकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.त्यांच्यातील होणाऱ्या भांडणामुळे अनेक वेळा गाड्यांचे अपघात झाला आहे. अनेकांना त्यांनी चावा घेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत

त्यामुळे भटक्या कुत्र्यांची खूपच मोठी भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.त्यामुळे नगरपंचायतीकडे नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहे.तेव्हा सदरची भटकी कुत्री पकडनेसाठी एजन्सी नेमण्यात यावी त्यासाठी टेंडर प्रोसेस करून लवकरात लवकर देहू नगरपंचायत हद्दीतील भटकी कुत्री पकडण्यात यावी. अशा स्वरुपाची चर्चा होऊन यासाठी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- पूजा सु. कालोखे

अनुमोदक :- सपना अ. मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. २७- देहू नगरपंचायत हद्दीमध्ये विद्युत वाहिनी भूमीगत करतांना खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत विचार विनिमय करुण निर्णय घेणे.

ठराव क्र. २७- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत विविध ठिकाणी रस्त्याच्या दुर्तफा व रस्त्यामध्ये विद्युत वाहिनी भूमीगत करण्यासाठी रस्त्याची खोदाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे विविध ठिकाणच्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून सदर ठिकाणच्या परिसरातील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायतीमार्फत दुरावस्था झालेल्या रस्त्यांची पाहणी करुन आवश्यकतेनुसार सदरचे रस्ते दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यकतेनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणे कामी वार्षिक कंत्राटदारास कार्यादेश देण्यात यावेत अथवा स्वतंत्र निविदा प्रक्रिया करुन सदरची कामे पुर्ण करणेसाठी व याकामी होणाऱ्या आर्थिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश बा. परंडवाल

अनुमोदक - मयुर द. शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.२८ :- देहू नगरपंचायत कार्यालय, व्यवसायिक गाळे, वैकुंठ गमन परिसर येथे थ्री फेजचे नविन लाईट मीटर घेणेबाबत विचार विमिनय करून निणर्य घेणे.

ठराव क्र.२८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यालय, व्यवसायिक गाळे, वैकुंठ गमन परिसर येथील जागेत स्थलांतरित करण्यात आले आहे . विविध विभागातील कार्यालयीन कामकाजासाठी लाईटची आवश्यकता आहे. त्यासाठी थ्री फेजचे कनेक्शन घेणे गरजेचे आहे.

तरी देहू नगरपंचायत कार्यालयासाठी थ्री फेज कनेक्शन घेण्यात यावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन यासाठी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक :- सुधिर मु काळोखे

अनुमोदक :- शितल अ लगवने

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . १७.१०.२०२२ रोजीची सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. २९- प्रभाकर टिळेकर यांचे घर ते पांडुरंग बबन टिळेकर यांचे घरापर्यंत ड्रेनेजलाईन टाकणेबाबत विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. २९- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत प्रभाकर टिळेकर यांचे घर ते पांडुरंग बबन टिळेकर यांचे घरापर्यंत ड्रेनेजलाईन नसल्याने सदर ठिकाणी नवीन ड्रेनेजलाईनचे काम करणे आवश्यक आहे. सदर परिसरातील नागरिकांकडुन सदर टिकाणी ड्रेनेजलाईन टाकणेसाठी नगरपंचायतीस तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

सदर ठिकाणच्या रस्त्यावर नवीन ड्रेनेजलाईन टाकणेसाठी सदर कामाचे अंदाजत्रक तयार करुन व त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून सदरचे कामकाज पुर्ण करण्यास व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीस व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - आदित्य चि. टिळेकर

अनुमोदक - सुधिर सु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मेहेरबान मा. अध्यसक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ३० :- प्रभाग क्र. ६ मध्ये स्वागत कमानी उभारणी बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.३०:- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यायत आला त्यावर विचार विनिमय करण्या त आला. देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र . ०६ मध्ये देहू नगरपंचायत स्थानिक निधीमधून कामे करण्यात यावी. जे नगरसेवक व नगरसेविका स्वागत कमानीसाठी मागणी करणार आहेत त्यांनी त्यांच्या लेटरहेड वरती द्यावेत.

तसेच ज्यांना स्वागत कमान घेयची आहे त्यांनी तो विषय अजिंठावर देण्यात यावा. कामकाज पूर्ण करण्यासाठी व या कमी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे .

सुचक – पूनम काळोखे

अनुमोदक – योगेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

विषय क्र. ३१:- प्रभाग क्र. ६ मध्ये अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.३१ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यायत आला त्यावर विचार विनिमय करण्या त आला. देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र. ०६ मध्ये साईड पट्टे व मधील पट्टीमध्ये पेव्हिंग ब्लॉक नसल्यामुळे रस्त्याने जाणाऱ्या - येणाऱ्या नागरिकांस त्रास होत आहे . यासंदर्भात सदर परिसरातील नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच हि कामे सर्व प्रभागात करण्यात यावीत. काम करत असताना प्रथम प्राधान्य प्रभाग क्र. ०६ मध्ये देण्यात यावे.

सदर ठिकाणच्या अंतर्गत रस्ते साईड पट्टे व मधील पट्टीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेसाठी कामाचे अंदाजपत्रक तयार करून व सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन सदर कामकाज पूर्ण करण्यास व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरवान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे .

सुचक - पूनम काळोखे

अनुमोदक - योगेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक १७/१०/२०२२

Scanned with OKEN Scanner